करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
| www.saptahiksandesh.com |

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.३५ | पाने-१६ | दि.०६/०९/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत ४ रू.


Shweta Gift & Toys
करमाळा शहरात प्रथमच अत्याधुनिक..'गिफ्ट आणि टॉईज' लवकरच आपल्या सेवेत..!


कु.श्वेता सचिन हिरडे हिच्या 4 थ्या वाढदिवसानिमित्त
शुभेच्छुक
■ SHWETA GIFT & TOYS
■ सा.संदेश परिवार, करमाळा.
हार्दिक शुभेच्छा


# तालुक्यात १२५ गणेश मंडळ तर्फे गणेशोत्सव-१६ गावात एक गाव एक गणपती

करमाळा : करमाळा तालुक्यात यावर्षी १२५ गणेश मंडळाच्यावतीने गणेश प्राणप्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. यात करमाळा शहरात २१ गणेश मंडळांनी तर तालुक्यातील १०४ गणेश मंडळांनी नोंदणी केली आहे. केम येथे चार, जेऊर येथे पाच मंडळांनी गणेशोत्सव साजरा करण्याचे ठरवले आहे. ग्रामीण भागातील १०४ गणेश मंडळापैकी १६ गावात एक गाव एक गणपती स्थापन केले जाणार आहेत. करमाळा शहरात १६ सप्टेंबरला गणेशोत्सावाचे देखावे सादर केले जाणार आहेत.

करमाळा शहरात नेहमीप्रमाणे गणेश विसर्जनाच्या आदल्या रात्री आकर्षक देखावे सादर केले जाणार आहेत. पोथरनाका येथील छत्रपती शिवाजी मंडळ (सावंतगल्ली) यांचा जिवंत देखावा वडसावित्री पुजा हा १५ स्पटेंबरला सुरू केला जाणार आहे. जय महाराष्ट्र मित्र मंडळाने डॉ.प्रदीपकुमार जाधव-पाटील यांच्या निधनामुळे देखावा रद्द केला आहे. किल्ला विभाग मित्र मंडळातर्फे रामसेतु देखावा (वानरसेना समुद्रात सेतु तयार करतात), लोकमान्य टिळक तरूण मंडळ किल्ला विभाग महिलावरील अत्याचाराचा सजीव देखावा सादर करणार आहेत. राजमाता अहिल्यादेवी हिंदु खाटीक तरूण मंडळाकडून भारूड सजीव देखावा., सरकार मित्र मंडळ तर्फे ३ फुटावर अधांतरीत महाराज देखावा, (पान ३ वर)

## १६ सप्टेंबरला शहरात देखावे



यावर्षी गणेशोत्सवात प्रत्येक मंडळाने आपल्या मंडळातील गणरायाची काळजी घेतली पाहिजे. गणेश स्थापना केली तिथे २४ तास स्वयंसेवक असणे गरजेचे आहे. प्रत्येक मंडळाने आपल्या मंडपामध्ये अधिकृत वीज कनेक्शन घेतले पाहिजे. तसेच रस्त्यावर व मंडपामध्ये केलेले लाईट डेकोरेशन काळजीपुर्वक करणे आवश्यक आहे व त्यावर सतत देखरेख करणे गरजेचे आहे. गणेश विसर्जन मिरवणुका वेळेवर सुरू करणे गरजेचे आहे. तसेच मिरवणुकीत कोणीही डॉल्बी लावणार नाहीत व कोणीही मद्यप्रशान करून येणार नाही याची काळजी घ्यावी अन्यथा संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. यावर्षी गणेशोत्सावाचे देखावे तसेच आदर्श मिरवणुकीसाठी बक्षीसे दिली जाणार आहेत. त्यासाठी चारजणांची समिती स्थापन केली आहे. सर्व मंडळाचे प्रतिनिधी व नागरीकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. ...श्री.विनोद घुगे (पोलीस निरीक्षक)

आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशिर्वादाने **समर्थ बालरूग्णालय, करमाळा** येथे

**स्त्रीरोग व प्रसुती शास्त्र** या नवीन विभागाचा

सस्नेह निमंत्रण

**डॉ.वृषाली अभिजित हंकारे** (स्त्रीरोग व प्रसुती तज्ञ)

**भव्य उद्घाटन सोहळा**

शुभहस्ते **मा.श्री.गणेश करे-पाटील** (अध्यक्ष, यशकल्याणी ग्रामीण सेवाभावी संस्था)

प्रमुख पाहुणे

**डॉ.गजानन गुंजकर** (MS SDH, Karmala)
**डॉ.सुभाष सुराणा** (IMA President)
**डॉ.महेश भोसले** (IMA Secretory)
**डॉ.पोपट नेटके** (KTMP President)
**डॉ.अमोल घाडगे** (KMG President)

**करमाळा मेडिकोज गिल्ड, करमाळा तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर्स असो;**

यांच्या उपस्थितीत **शुक्रवार दि.६/९/२०२४ रोजी सायंकाळी ६ वाजता** संपन्न होत आहे.
तरी याप्रसंगी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे..!

उपलब्ध सुविधा
- प्रसुतिपूर्व, प्रसुती व प्रसुती पश्चात सुविधा.
- नॉर्मल डिलीवरी, सिझेरियन सुविधा.
- PCOS अनियमित पाळी, पाळीच्या तक्रारी.
- कुटूंब नियोजन सल्ला व उपचार
- वंध्यत्व निवारण गर्भाशयाच्या पिशवीचे आजार व ऑपरेशन

निमंत्रक
**श्री.नामदेव विठ्ठल गायकवाड**
**डॉ.वृषाली अभिजीत हंकारे** (MBBS DGO)
**डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड** (MBBS DCH)
**डॉ.पुष्पांजली नंदकुमार शिंदे** (MBBS MD DNB)
**डॉ.अभिजीत विश्वास हंकारे** (MBBS DCH)
**सौ.प्रतिभा दिनेश सोरटे**
**श्री.दिनेश बाळासाहेब सोरटे**

स्थळ
**समर्थ बालरूग्णालय**
गायकवाड चौक, करमाळा.
जि.सोलापूर

श्रध्देतून भक्ती आणि भक्तीतून प्रेम तिथेच भगवंताचे स्वरूप असते.

## संपादकीय.............................................!

# गणरायाचे आगमन !

हिंदू संस्कृतीमध्ये गणदेवतेला फार महत्व आहे. दैवतामध्ये आरंभीची देवता म्हणून गणपतीला मान आहे. कोणत्याही कार्याला प्रारंभी गणरायाची पुजा केली जाते. राज्यातील बहुतेक घरावर तसेच मंदिरावर गणेश पट्टी किंवा गणेश प्रतिमा असते. सरर्स ग्रंथामध्ये गणपती नमन प्रथम आहे. महानुभावपंथातील रूक्मीणी स्वयंवरातही गणेशाचा उल्लेख आहे. ज्ञानेश्वरांनीही 'ओम नमोजी आद्या' म्हणत गणरायाला वंदन केले आहे. सुपारी हे गणदेवतेचे प्रतिक समजून तीची पुजा प्राधान्याने होते. 'चतुर्थी' हा गणपतीचा पुजेचा व उपवासाचा दिवस असतो. याशिवाय भाद्रपद शुध्द चतुर्थीला (गणेश चतुर्थी) गणपती येतात आणि भाद्रपद चर्तुदशी म्हणजे अनंत चतुदर्शीला त्यांना निरोप दिला जातो.

यानुसार दरवर्षी गणेशोत्सव येत असतो, प्रशासन जागे होते, मंडळाचे प्रतिनिधी जोरदार प्रयत्न करतात, लोक वर्गणी देतात, गणरायची स्थापना होते, दररोज आरती होते, दहाव्या दिवशी गणरायाचे विसर्जन होते. तो एक भव्य सोहळा असतो. या गणरायाची वाट अनेकजण पाहतात. जे गणेश मंडळाचे कार्यकर्ते आहेत, त्यांना नेतृत्व करण्याची संधी मिळते. कार्यकर्त्यांना काहीतरी नवीन करून दाखवण्यास वाव मिळते. विद्यार्थ्यांना नव्या नव्या स्पर्धा जिंकायला मिळतात, महिलांनाही वेगवेगळ्या कार्यक्रमात भाग घ्यायला मिळतो. वृध्दांना विरंगुळा मिळतो. रांगोळी स्पर्धा, व्याख्याने, ऑर्केष्ट्रा, प्रबोधन अशा उपक्रमाची रेलचेल असते. व्यापाऱ्यांची विक्री होते, बॅन्ड, ढोली-बाजा, लेझीम व अन्य मंडळींना सज्जड सुपाऱ्या मिळतात. काहीना झिंगायला मिळते तर काहींना मिरवायला मिळते. अशा काही ना काही माध्यमातून अनेकांना गणराया कधी येतील याची उत्सुकता असते. गेल्यावर्षी दुष्काळी स्थिती होती पण संपुर्ण गणपतीच्या कालावधीत पाऊस पडला आणि बहुतेकांच्या गणपती चांगलेच लक्षात राहिले. यावर्षी गणपती येण्याच्या अगोदर पाऊस झाल्याने गणरायाचे स्वागत करण्यास उत्साह वाढलेला आहे.

गणरायाची नेमकी कथा काय आहे, याचा शोध घेतल्यावर समजले की.. आद्य शंकराचार्यांनी गणपतीचे महत्व जाणून पाच मुख्य देवतामध्ये स्थान दिले आहे. गणपती ही बुध्दीची व शुभारंभाची देवता आहे. गणपतीला तशी ११० नावे आहेत; पण गणपतीची बारा मुख्य नावे आहेत. त्यामध्ये गणपतीच्या पराक्रमावरून काही नावे पडली तर काही गणपतीच्या शरीरावरून पडली आहेत. बारा नावामध्ये वक्रतुंड, एकदंत, कृष्णपिंगाक्ष, गजवक्र, लंबोदर, विकट, विघ्न राजेंद्र, धुम्रवर्ण, भालचंद्र, विनायक, गणपती व गजानन अशी ती नावे आहेत. गणपतीला 'एकदंत' का म्हणतात त्याच्या काही कथा आहेत. एका कथेत परशुरामाबरोबर गणपतीचे युध्द झाले, त्यात गणपतीचा एक दात पडला. दुसऱ्या कथेत कैलासावर रावणाला गणपतीने अडवले, तेंव्हा रावणाने गणपतीचा एक दात उपटला, तर तिसऱ्या कथेत भाऊ कार्तिकीने लहानपणी खेळताना गणपतीचा एक दात भग्न केला. अर्थातच गणपतीला एक दात राहिला म्हणून गणरायाचे नाव एकदंत असे नाव पडले. गणरायांचा दोनदा जन्म झाला. पहिला जन्म माघी शुध्द चतुर्थी व दुसरा जन्म भाद्रपद शुध्द चतुर्थीला झाला आहे. दोनदा जन्म झाला म्हणून गणपतीला 'व्दैमातुर' म्हणूनही ओळखले जाते.

गणेश शब्दाचा अर्थ गणांचा ईश वा प्रभु असा होतो. हे गण शिव-पार्वतीचे सेवक होते. या गणांचा अधिपती म्हणजे गणपती होय. गणपतीचा प्रथम उल्लेख ऋग्वेदात आढळतो. गणपती जन्माच्या कथा वेगवेगळ्या ग्रंथात वेगवेगळ्या सांगितलेल्या आहेत. गणेशपुराण, वराहपुराण, मत्स्यपुराण, शिवपुराण, ब्रम्हैवर्तपुराण या ग्रंथात गणपतीच्या कथा सांगितलेल्या आहेत. त्यापैकी महत्वाची कथा म्हणजे पार्वती ही एकदा स्नानाला गेली असताना तिने नंदीला व्दारपाल नेमले परंतू शंकर हे नंदीला डावलून थेट स्नानगृहापर्यंत गेले होते. त्याचा राग पार्वतीला आला. त्यानंतर पार्वतीने आपल्या मैत्रीणी जया व विजया यांच्या सल्ल्याने मातीचा पुतळा बनवला व त्यामध्ये प्राण ओतला. त्या मुलास मग पुढे स्नान करताना व्दारपाल म्हणून नेमले. भगवान शंकर परत आले. तेंव्हा या पार्वतीच्या मुलाने त्यांना रोखले व त्यांच्या बरोबर युध्द केले. त्यात शंकर व त्यांचे गण हारले. त्यानंतर नारदाने शंकराला यश मिळवण्याचा सल्ला दिला. त्यानुसार विष्णूने या मुलास मोहित केले व त्यानंतर महादेवाने त्याचे मुंडके उडवले. ही घटना समजताच पार्वती क्रोधीत झाली, त्यामुळे तिने सृष्टी नष्ट करण्याचे ठरवले. त्यानंतर देवतागणांनी पार्वतीला विनंती केली व पुत्र परत जिवंत करण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर पार्वतीने पुत्र पुन्हा जीवंत करावा व त्याचे महत्व राहिल अशी शक्ती त्याला द्यावी; अशी मागणी केली. त्याप्रमाणे शंकराने गणाला आज्ञा दिली 'जा जो पहिला प्राणी भेटेल त्याचे शीर तोडून आणा.' त्यानुसार गणांना प्रथम हत्ती हा प्राणी भेटला व त्याचे शीर (डोके) तोडून आणले व ते या मुलाला लावले व तो जिवंत झाला. शंकराने त्याला स्वपुत्र म्हणून मान्यता दिली. याबाबत अनेक वेगवेगळ्या कथा असल्यातरी ही सर्वमान्य कथा आहे.

गणपतीच्या लग्नाची कथाही मजेशीर आहे. गणपतीचा भाऊ कार्तीकेय या दोघांची लग्नासाठी वादावादी झाली तेंव्हा ठरले जो कोणी पृथ्वी प्रदक्षणा पुर्ण करेल त्याचा पहिला विवाह होईल. कार्तिकेय हा मोरावर बसून पृथ्वी प्रदक्षिणेला निघाला तर गणपतीने शिव-पार्वतीला सात फेऱ्या मारल्या. शास्त्रानुसार ही शतवार पृथ्वीपरिक्रमा झाली. त्यामुळे गणपती जिंकला व त्यांच्या विवाहला मान्यता मिळाली. त्यानंतर विश्वरूपाच्या दोन मुली रिध्दी (बुध्दी) व सिध्दी यांच्याबरोबर गणपतीचा विवाह झाला. तंत्र ग्रंथात तंत्रमतानुसार गणपतीचा विवाह लक्ष्मी व सरस्वती बरोबर झाला आहे. असे असलेतरी गणपतीला तीव्रा, ज्वालिनी, नन्दा, सुभोगदा, कामरूपिनी, उग्रा, तेजोवती, सत्या आणि विघ्ननाशिनी अशा नऊ पत्नी होत्या. याशिवाय एका कथेत तुलशी नामक स्त्री गणपतीबरोबर विवाह करू इच्छित होती. गणपती हा ब्रम्हचार्यवृत्तीचा असल्यामुळे तीला त्याने नाकारले व तू दानव पत्नी होशील असा शाप दिला, तर तीने तू विवाहीत होशील असा शाप दिला. गणपतीला लक्ष्य हा सिध्दीचा तर लाभ हा बुध्दीचा पुत्र आहे.


गणपतीला जी पडलेली नावे आहेत ती गणपतीच्या कर्तृत्वाने पडलेली आहेत. विनायक नावामध्ये गणपतीने नरान्तक व देवान्तक या दोन आसुराचा व धुमाक्ष नावाच्या दैत्याचा वध केला. मयुरेश्वर बनून सिंधू नामक दैत्याचा वध केला, गजानन होऊन सिंदूर, धुम्रकेतू अवतारात अनेक दैत्यांचा, वक्रतुण्डमध्ये मत्स्यासुराचा, एकदन्त मध्ये मुदासुराचा, महोदर मध्ये मोहासुराचा, लम्बोदरमध्ये क्रोधासुराचा, विकटमध्ये कामासुराचा, विघ्नराज मध्ये ममासुराचा (अंहकाराचा), धुम्रवर्णमध्ये अभिमानसुराचा अशा दैत्यांचा वध केला आहे. याशिवाय गणरायांनी आणखी एक महत्वाचे काम केले आहे. कौरव-पांडवाच्या मृत्यूनंतर व्यास महर्षी हे ध्यानाला बसले होते. त्यांना महाभारताच्या साऱ्या घटना आठवू लागल्या. त्याचा विशाल ग्रंथ करावा अशी त्यांची इच्छा झाली. तसे त्यांनी ब्रम्हाला बोलूनही दाखवले. त्यानंतर ब्रम्हदेवांनी तुम्ही गणपतीकडे जा, ते तुम्हाला ग्रंथ लिहून देतील; असे सांगितले. त्यानंतर व्यास महर्षी गणरायाकडे आले. त्यांनी गणपतीला ग्रंथ लिहिण्याबाबत विनंती केली. गणपतीने 'मी लिखाण करेल पण माझी एक ओळ लिहायची झाली की पुढची ओळ सांगावी लागेल, मी थांबणार नाही याची काळजी घ्या. जर मध्ये वेळ गेलातर मी काम अर्धेच सोडेल.' त्यावर व्यासांनी त्यांना एक अट घातली... 'हरकत नाही पण अर्थ न समजता आपण लिखाण करू नये.' ती अट गणपतीने मान्य केली. त्यानंतर लिखाण सुरू झाले. यासाठी व्यास महर्षीनी या महाभारतामध्ये ८८०० कुट श्लोक समाविष्ट केले आहेत. त्याचा विचार करताना गणपतीचा काही वेळ गेला, त्यात व्यासांनी पुढील भाग आठवून मजकूर सांगितला.

गणपतीरायाच्या काही मजेशीर कथा आहेत .त्यामध्ये गणपतीने चंद्राला शाप दिलेली कथा आहे. एकदा गणपती उंदरावर बसून जात असताना समोरून एक साप आला. त्याला पाहून उंदीर घाबरला व आडवा तिडवा पळू लागला, त्यावेळी गणपती उंदरावरून पडले. त्यावेळी त्यांच्या पोटातले मोदक पडले. त्यानंतर गणपतीने पडलेले सर्व मोदक गोळा केले व पोटात भरले. त्या आडव्या आलेल्या सापाला पोटाला बांधले. हा प्रकार पाहून चंद्र हसला तेंव्हा गणपतीने त्याला शाप दिला. गणेश चतुर्थीला तुझे कोणी दर्शन घेणार नाहीत. त्यामुळे चतुर्थीच्या दिवशी चंद्र पाहणे अशुभ मानले जाते. गणपतीच्या वाहनाबाबतही दोन प्रवाह आहेत. काश्मीर, नेपाळ व आफगाणिस्तानात गणपतीचे वाहन सिंह आहे तर आपल्याकडे उंदीर आहे. जगातील इंडोनिशाया, जावा बेटावर गणपतीच्या मुर्ती आहेत. आपल्या देशात सर्वात जास्त महाराष्ट्रात गणेशोत्सव मोठ्या स्वरूपात साजरा केला जातो. कर्नाटक, आंध्रप्रदेशात उत्सव साजरा करतात परंतू घरगुती स्वरूपाचा असतो. राजस्थानमध्ये गणगौर सणात गणपतीची पूजा करतात. बंगालमध्ये दुर्गापुजेच्या काळात गणपतीची पूजा करतात. आपल्या राज्यात पेशव्याच्या काळात गणपतीचा उत्सव साजरा होत होता परंतू तो घरगुती स्वरूपाचा होता. सन १८९३ साली लोकमान्य टिळक यांनी गणेशोत्सवास सार्वजनीक स्वरूप दिले. गणपतीची आठ स्थाने आहेत. त्यामध्ये श्रीमयुरेश्वर-मोरगाव, श्रीसिध्दीविनायक-सिध्दटेक, श्रीबल्लाळेश्वर-पाली, श्रीवरदविनायक -महड, श्रीचिंतामनी-थेऊर, श्रीगिरजात्मज-लेण्यांद्री, श्रीविघ्नेश्वरविनायक -ओझर, श्रीमहागणपती-रांजणगाव यांचा समावेश आहे. त्याला आष्टविनायक म्हणतात. या गणरायचा ॐ गणपतयेनम: हा मंत्र आहे. शस्त्र-पाश, अंकूश, परशु व दंत आहेत.

असे गणरायाचे आगमण ७ सप्टेबरला होत आहे. या बुध्दीच्या देवतीची वाजत-गाजत मिरवणूक दोनदा काढली जाते. एकदा आणताना व दुसऱ्यांदा गणपती विर्सजन करताना. खरंतर गणेश विसर्जन हा दु:खाचा प्रसंग आहे. त्यावेळी आपला लाडका देव विर्सजीत करतो; याचे वाईट वाटून त्याच प्रकारची मिरवणूक निघायला पाहिजे. पण आपल्याकडे उलट होते. त्यादिवशी मोठा थाटमाट केला जातो, नृत्य सादर केले जाते, ते ही मद्यप्राशन करून. काही मंडळेतर नृत्यांगणा आणतात. या मिरवणूकीच्या मानावरून भांडणे-मारामाऱ्या होतात. पोलीस व प्रशासनांची कसोटी लागते. अनेकांना गणपती येण्याचा आनंद वाटत असताना पोलीसांच्या अंगावर काटा उभा राहतो. खरंतर प्रत्येकांनी विचार केला पाहिजे.., या लाडक्या दैवताच्या आगमण ते विसर्जन खुप आनंदी वातावरण ठेवण्याची गरज आहे. समाजप्रबोधनाची गरज आहे. रस्त्यावर अतिक्रमण करणे, मोठ-मोठ्यांनी ध्वनीक्षेपक लावणे, धमकावून वर्गणी घेणे, असभ्य मिरवणूक काढणे, असभ्य वर्तन करणे याबाबी खुपच अनर्थकारी आहेत. अनेक मंडळे खुप विधायक उपक्रम राबवतात, पण अपवादात्मक लोक चुकीचे कृत्य करतात व त्याचा ठपका अन्य मंडळावर येतो. त्यामुळे असे प्रसंग होऊ नये म्हणून सर्वांनीच सतर्क राहण्याची गरज आहे. असो आपण काळजी घ्याल यात काही चिंता नाही. आज फक्त म्हणू या 'आले रे आले गणपती आले.., एक-दोन-तीन-चार- गणपतीचा जयजयकार !'

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# शिवसेनेच्या उपशहरप्रमुख पदी लक्ष्मण यादव यांची निवड



करमाळा(सं.प्र.) : शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे करमाळा शहर उपप्रमुखपदी लक्ष्मण भगवानराव यादव (पेंटर) यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीचे पत्र शहरप्रमुख संजय शिंदे यांचे हस्ते यादव यांना नुकतेच देण्यात आले आहे. निवडी नंतर बोलताना लक्ष्मण यादव यांनी शिवसेनेच्या आजी-माजी व ज्येष्ठ कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन करमाळा शहरात शिवसेनेचे विचार घराघरा पर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच पक्षवाढीसाठी आपण प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले. निवडीबद्दल शिवसेनेचे माजी उपतालुकाप्रमुख जितेंद्र सुरवसे यांनी लक्ष्मण यादव यांचे विशेष अभिनंदन केले.

# स्व.ॲड.नानासाहेब घाडगे यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्त आरोग्य शिबीर संपन्न

करमाळा(सं.प्र.) : ज्येष्ठ विधिज्ञ व माजी उपनगराध्यक्ष स्व.ॲड.नानासाहेब घाडगे यांच्या चौथ्या पुण्यस्मरण दिनानिमित्त इतर अनावश्यक गोष्टींना फाटा देत त्यांचे सुपुत्र डॉ.अमोल घाडगे व स्नुषा डॉ.स्वाती घाडगे यांनी केशव प्रतिष्ठान, शिवरत्न ग्रामीण सेवाभावी संस्था, सर्वोदय प्रतिष्ठान व तरटगाव ग्रामस्थ यांचे संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबीरात प्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते ॲड.घाडगे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर ॲड.घाडगे यांच्या कार्यावरती प्रकाशझोत टाकण्यात आला. त्यानंतर उपजिल्हा रूग्णालयाचे अधिक्षक गजानन गुंजकर यांचे हस्ते शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी करमाळा मेडिकोज गिल्ड व करमाळा तालुका मेडिकल प्रॅक्टीशनर्स असो; चे सर्व प्रमुख पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या आरोग्य शिबीरात बार्शी येथील कॅन्सर तज्ञ डॉ.राहुल मांजरे-पाटील, ह्रदयरोग तज्ञ डॉ.विकास खामकर(बार्शी), दंततज्ञ डॉ.विजयसिंह तनपुरे यांचे सोबतच श्रवण यंत्र संदर्भातील तपासणी पुणे येथील श्री शुक्ला व श्री सिंग यांनी केली. या



आरोग्य शिबीरामध्ये जवळपास १८४ रूग्णांची तपासणी करण्यात आली. याप्रसंगी डॉ.श्रीराम परदेशी, डॉ.वसंतराव पुंडे, डॉ.केमकर, डॉ.रोहन पाटील, डॉ.कविता कांबळे, डॉ.वर्षा करंजकर, डॉ.पोपट नेटके, डॉ.हर्षवर्धन माळवदकर, डॉ.अशोक शिंदे, डॉ.आशितोष कापले, डॉ.विठ्ठल पवार, डॉ.कुलकर्णी, राजेंद्र घळके, धनराज मोरे, राजकुमार घाडगे, किरण वाळुंजकर, मिलींद माने, अरविंद घाडगे, अमोल बावडकर, राम घाडगे, मनोज कुलकर्णी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शिवरत्न संस्थेचे अध्यक्ष अमरजित साळुंखे यांनी केले तर प्रास्ताविक डॉ.अमोल घाडगे यांनी केले. उपस्थितांचे आभार जगदीश आगरवाल यांनी मानले.

करमाळा शहरातील एकमेव 'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
विघ्नहर्ता इंटिरीयर
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051
देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर
• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका
प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252
पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर





प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ज ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर

पान १ वरून पुढे..

# तालुक्यात १२५ गणेश मंडळ तर्फे गणेशोत्सव

श्री गणेश व्यापारी मंडळाकडून महिला अत्याचार व शिवकालीन शिक्षा., दत्तपेठ तरूण मंडळ तर्फे बायपण भारी देवा.., गजराज तरूण मंडळ मेनरोड यांचा रूममेट(आई-वडीलांना फसवणारे विद्यार्थी), सहकार युवक मित्र मंडळ यांचा चालू घडामोडीवरील देखावा, राशीनपेठ तरूण मंडळाच्यावतीने पिंगळा., गजानन सोशल क्लबचा जादुगर ईश्वर., वाल्मीकी मित्र मंडळ कानाड गल्लीचा व्यसनमुक्ती व अंधश्रध्दा निर्मुलनचा जिवंत देखावा., नवजवान सुतार तालीम मंडळाचा श्रीकृष्णाने गोवर्धन पर्वत उचलेला देखावा. असे देखावे विविध मंडळाकडून सादर होणार आहेत.

# सुनंदा जाधव यांना आदर्श सक्षम महिला पुरस्कार जाहीर



करमाळा(सं.प्र.) : महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक संघाच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त देण्यात येणारा सन २०२३-२४ चा आदर्श सक्षम महिला पुरस्कार नगरपालिकेच्या नामसाधना प्राथमिक शाळा मुले नं. च्या मुख्याध्यापिका सुनंदा सुरेश जाधव यांना जाहीर झाला आहे.

युरस्कारासाठी १४५ प्रस्ताव आले होते, त्यामध्ये सौ.जाधव यांची निवड झाली आहे. मुख्याध्यापिका माने यांनी आदर्श शाळा करून शाळेमध्ये अनेक उपक्रम राबविले आहेत. त्याची दखल घेऊन सौ.जाधव यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

# श्री गणेश व्यापारी मंडळ गणेशोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी अभिजीत वाशिंबेकर




करमाळा(सं.प्र.) : श्री गणेश व्यापारी मंडळ गणेशोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी अभिजीत वाशिंबेकर यांची तर उपाध्यक्ष पदी वेदांत उदावंत, अथर्व जव्हेरी व मिरवणूक प्रमुख पदी प्रथमेश मिसाळ यांची निवड करण्यात आली आहे. मंडळाच्या वतीने यावर्षी गणेश उत्सव विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करून साजरा करण्यात येणार आहे. श्री गणेश आगमन सोहळा धुमधडाक्यात साजरा होणार असून यावेळी देवीचा गोंधळ, संबळ वाद्य (बीड) हे मुख्य आकर्षण असणार आहे. तसेच गणेशोत्सव कालावधीत लिंबू चमचा, स्लो सायकल, संगीत खुर्ची, रांगोळी स्पर्धा घेतली जाणार आहे. तसेच दररोज दोन वेळा आरती व महाप्रसाद, दहा दिवस फिक्सल लाईटींग असणार आहे. तसेच मंडळाच्या वतीने महिला अत्याचार व शिवकालीन शिक्षा (चौरंगा) या विषयावर आधारीत सजीव देखावा सादर केला जाणार आहे. गणेश विर्सजनाची मिरवणूक अनाठायी खर्चाला फाटा देत साध्या पध्दतीने काढण्यात येणार आहे. यावेळी नागरीकांनी सहभागी व्हावे; असे आवाहन करण्यात आले आहे.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !
सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट
उपवासाचे पदार्थ
रेडिमेड स्नॅक्स
• खजुर (लाल व काळी)
• सिडलेस खजुर (लाल व काळी)
• राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
• गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
• गुलकंद राजगिरा वडी व रोल
• नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
• केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
• बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
• बटाटा चिलीमिली
• बटाटा चिवडा (गोड व तिखट)
• राजगिरा लाही
• गावरान खारे शेंगदाणे
• भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
• तिखट शेंगदाणे
• लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
• उपवास शाबुदाणा खाकरा
• उपवासाचे गोड लिंबू लोणचे
• शेंगतेल
• शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
• शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
• इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
• पॅकींग सायकल भगर
• राजगिरा इ.



काटदरे उपवास पीठ
• राजगिरा पीठ
• उपवास भाजणी पीठ
• शिंगाडा पीठ
• सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)
[illegible]
• बटाटा पापड
• बटाटा - भगर पापड
• बटाटा व शाबुदाणा
• रंगीत पापडी
• शाबुदाणा पापडी
• बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
• बटाटा खिस
• बटाटा शेव, बटाटा स्क्रू
• शाबुदाणा बॉबी
*टीप : डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !
॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
एव्हरफ्रेश सुपरमार्ट
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥
*नियम व अटी लागू.
किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन ॲन्ड स्वीटस् । बेकरी ॲन्ड मिल्क प्रॉडक्टस् । नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम ॲन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य
पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031


10 सप्टेंबर
करमाळा शहरातील
प्रतिष्ठीत व्यापारी, भावी नगरसेवक
व आमचे मित्र
मा.श्री.
रितेशशेठ
कटारिया
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक
शुभेच्छा
शुभेच्छुक
• श्री.प्रकाश क्षीरसागर व परिवार
• चैतन्य पाटील करमाळा, जि.सोलापूर.

## गणेश चिवटे यांच्या राजकीय भवितव्यासाठी

# भाजप पक्षाची संपूर्ण ताकद उभी करणार : चेतनसिंह केदार-सावंत



करमाळा(सं.प्र.) : भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या राजकीय भवितव्यासाठी भाजप पक्षाची संपूर्ण ताकद उभी करणार ; असे प्रतिपादन भाजपाचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी केले.

मिरगव्हाण येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात प्रमुख पाहुणे म्हणून केदार-सावंत बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, की गणेश चिवटे हे हिंदुत्ववादी विचारावर चालणारा कार्यकर्ता असून गेल्या वीस वर्षात भाजपा पक्षाचे काम त्यांनी नेटाने उभे केले आहे. तालुक्यात विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रमासोबतच दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून हजारो कुटूंबांना त्यांनी रोजगाराचे साधन उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे जनतेच्या मनात त्यांनी विश्वासाचे घर निर्माण केले आहे. त्यांनी आता सक्रिय राजकारणात उतरले पाहिजे; अशी सर्वसामान्य लोकांची अपेक्षा आहे. भाजपचा जिल्हाध्यक्ष म्हणून मी आपणांस ग्वाही देतो की गणेश चिवटे यांना आपल्याला अपेक्षित असणाऱ्या पदापेक्षाही मोठे पद मिळेल; यासाठी पक्षाची संपूर्ण ताकद मी त्यांच्या पाठीशी उभी करणार असे सांगितले.

यावेळी शेतकऱ्यांना संबोधित करताना गणेश चिवटे म्हणाले, की करमाळा तालुका हा शेजारील इंदापूर व बारामती तालुक्याच्या दृष्टीने रोजगार, तंत्रमान, शिक्षण व आरोग्य याबाबत खूप मागास आहे. त्यामुळे दूरदृष्टीने काम उभे करावे लागेल. लोकांचे आशिर्वाद व त्यांचे प्रेम या बळावर मी आजही लोकांची सेवा, मदत करू शकतो. भविष्यात याच लोकांच्या पाठींब्यावर आणखी खंबीरपणे उभे राहण्याचे काम करणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करमाळा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटीबध्द राहू; असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भाजपाचे जिल्हा चिटणीस विनोद महानवर यांनी केले तर उपस्थितांचे आभार भाजपा सहकार सेलचे आजिनाथ सुरवसे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी जिल्हा उपाध्यक्ष अफसर जाधव, तालुका अध्यक्ष रामा ढाणे, शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, तालुका सरचिटणीस काकासाहेब सरडे, बिटरगावचे सरपंच डॉ.अभिजीत मुरूमकर, वंजारवाडीचे सरपंच प्रविण बिनवडे, उपसरपंच लक्ष्मण शेंडगे, बिभीषण गव्हाणे, हरिभाऊ झिंजाडे, विष्णू रंदवे, संदीपान कानगुडे, सोमनाथ घाडगे, दादासाहेब देवकर, नितीन निकम, नाना अनारसे, हनुमंत रणदिवे, गणेश परदेशी, हर्षद गाडे, किरण शिंदे, सचिन कानगुडे, कपिल मंडलिक, नामदेव भोगे, जयसिंग भोगे, आबा वीर, मोहन नेटके, तुकाराम भोसले, अशोक सातपुते, विशाल घाडगे, अजय डवले, सुखदेव घरबुडे, चंद्रसेन घरबुडे, एकनाथ लावंड, रामदास लावंड, विठ्ठल पाटील, लक्ष्मण शिंदे, विकास हाके, संतोष भस्मे आदी पदाधिकारी सह शेतकरी बांधव उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मिरगव्हाणचे माजी सरपंच मच्छिंद्र हाके, ग्रा.पं.सदस्य नवनाथ खाडे व भाजपा पदाधिकारी यांनी केले.

# जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलमध्ये पालक सभा संपन्न

करमाळा (सं.प्र.) : झरे येथील जयप्रकाश बिले पब्लिक स्कुलमध्ये पालक सभा घेण्यात आली. यावेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष जयप्रकाश बिले, सचिव युवराज बिले, संचालिका स्वाती बिले, मुख्याध्यापिका अमृता परदेशी, सर्व शिक्षक, कर्मचारी तसेच पालक उपस्थित होते. यावेळी पालकांनी शैक्षणिक व्यवस्थेबद्दल विचार व्यक्त केले. जयप्रकाश बिले यांनी पालकांशी संवाद साधला. सुत्रसंचालन नम्रता साळुंखे यांनी केले तर आभार सतीश कोंडलकर यांनी मानले.

लक्ष्मीकांत देवी (9421063525, 8805633525)

**श्रीजी इस्टेट एजन्सी**

- घरजागा, दुकान जागा
- प्लॉट व बंगले
- जमीन बिनशेती करणे
- व्यवहार करून दिले जातील
- सरकारी दस्तऐवजची कागदपत्र घरपोहोच केली जातील.

पत्ता : मेनरोड, करमाळा.

खुशखबर मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको नगर-बारामती-सोलापूर खुशखबर

बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ

**डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)**

आता आपल्या **करमाळ्यात !**

उपलब्ध सुविधा...

- मुळव्याधवर इंजेक्शन
- डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब
- एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब
- संडासवाटे रक्त येणे, पु येणे
- संडासची जागा बाहेर पडणे
- संडास जागी खाज व आग होणे
- संडासाचा नागवेडा
- संडास नंतर बसण्यास त्रास होणे
- भगंदर, फिशर
- चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)

ओपीडी /ऑपरेशन ठिकाण

दर गुरूवार व सोमवार

वेळ : सकाळी ९.०० ते १२.००

**लोकरे हॉस्पिटल**

कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर

(९८५०८५१००५)

परिचय

डॉ.विकास देविदास नागरगोजे

मुळव्याध तज्ञ

पदवी : नाशिक

पदवोत्तर : मुंबई

विशेष सुचना...

१. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रुग्णांची तपासणी करण्यात येईल.
२. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे.
३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील.
४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य.
५. परगावच्या रुग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.

नाव नोंदणीसाठी संपर्क मो.9763035862

बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

# शेलगाव (क) येथील कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षात प्रवेश



करमाळा(सं.प्र.) : शेलगाव (क) येथील कार्यकर्त्यांनी माजी आमदार नारायण पाटील यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पक्षात प्रवेश केला.

जेऊर येथील माजी आमदार कार्यालयात हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अनिकेत शिंदे, भूषण माने, अनिल माने, ग्रामपंचायत सदस्य नितीन जगताप, दत्तात्रय वीर, दिपक वीर, पांडूरंग गोरे, युवराज वीर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश केला. या सर्वांचे सत्कार माजी आमदार नारायण पाटील यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सभापती अतुल पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष पांडूरंग वीर, बाजार समितीचे संचालक बाळासाहेब पवार, पंचायत समितीचे माजी सदस्य जयराम सोरटे, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य विनोद गरड, विक्रम पवार आदी मान्यवरांसह आनंद वीर, संदीप पाटील, आण्णा शिंदे, महेश दास, प्रविण जगताप, अक्षय वीर, फिसरे येथील राजाभाऊ पाटील उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आमदार पाटील म्हणाले, की राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आणण्यासाठी आता सर्वांनी या परिवर्तन लढ्यात सहभागी झाले पाहिजे. देशाचे माजी कृषी मंत्री शरदचंद्र पवार यांचे नेतृत्वाखाली काम करत असताना करमाळा तालुक्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी वीज, पाणी व शेतमालाला चांगला बाजारभाव मिळवून देण्यासाठी आपण यापुढे अहोरात्र कार्यरत राहणार आहे. आगामी विधानसभा निवडणूक ही विकासाच्या मुद्यावर लढली जाणार असल्याने शेलगाव येथील कार्यकर्त्यांनी माझ्या नेतृत्वावर दाखवलेला विश्वास व पाठबळ देण्याचा घेतलेला निर्णय माझा उत्साह वाढवणारा आहे; असेही माजी आमदार पाटील यांनी सांगितले.प्रास्ताविक विनोद गरड यांनी केले तर आभार राहुल गोडगे यांनी मानले.

**डॉ.जांभळे इमर्जींग सेंटर अॅन्ड पॅथॉलॉजी लॅब**

बसस्टॅन्ड समोर, नौशाद कोल्ड्रींक्सच्या वर, पहिला मजला, करमाळा.

**पाहिजेत**

१. पार्टटाईम/फुलटाईम लॅब टेक्नीशियन (D.M.L.T.)

२. नाईट ड्युटी (D.M.L.T. अनुभवी,लॅब टेक्नीशियन)

तरी इच्छुक मुले/मुली यांनी पगाराचे अपेक्षेसह त्वरीत वरील पत्त्यावर किंवा मोबाईलवर संपर्क करावा !

संपर्क : मो.9021909262


स्थापना : १४ जानेवारी २०००
रजि.नं. ४१२/१३
गजानन सोशल अँड स्पोर्ट्स क्लब
गणेशोत्सव २०२४
२५
रौप्य महोत्सव वर्ष
नुतन पदाधिकाऱ्यांचे
हार्दिक अभिनंदन..!
मा.प्रशांत (आण्णा) ढाळे
संस्थापक, अध्यक्ष
अध्यक्ष
मेजर अमोल कांबळे
उपाध्यक्ष
बाशिद भाई शिकलकर
उपाध्यक्ष
परमसिंग मल्होत्रा
मिरवणूक प्रमुख
अमित बुद्रुक
खजिनदार
तिर्थराज भांडवलकर
सचिव
ओम लोकरे
कार्याध्यक्ष
साई पलंगे
शुभेच्छुक : गजानन सोशल अँड स्पोर्टस क्लब, करमाळा.


2024
श्री गणेश व्यापारी मंडळ
मेनरोड, करमाळा., जि.सोलापूर
गणेशोत्सव समितीच्या नूतन कार्यकारिणीचे हार्दिक अभिनंदन !
अध्यक्ष
अभिजीत अनिलभाऊ वाशिंबेकर
उपाध्यक्ष
वेदांत प्रसाद उदावंत
उपाध्यक्ष
अथर्व अमोल जव्हेरी
मिरवणूक प्रमुख
प्रथमेश आनंद मिसाळ
शुभेच्छुक
श्री गणेश व्यापारी मंडळ, करमाळा.


।। श्री कमलाभवानी प्रसन्न ।।
स्थापना:- १९८८
रजि. नं.एफ ४५७६
श्रीमंत
जय महाराष्ट्र मित्र मंडळ
श्री गणेशोत्सव २०२४
नुतन पदाधिकाऱ्यांचे
हार्दिक अभिनंदन !
संस्थापक
प्रविण कटारिया
अध्यक्ष
सुनिल जाधव (सर)
कार्याध्यक्ष
संतोष (पिंटू) गुगळे
उपाध्यक्ष
सुदेश भंडारे
उपाध्यक्ष
तुळशीराम दुधाट
खजिनदार
राजकुमार घाडगे
मिरवणूक प्रमुख
नितीन घोलप
आरास प्रमुख
इसाक दारुवाले
हाजी अल्ताफशेठ तांबोळी
चेअरमन जय महाराष्ट्र पतसंस्था
* शुभेच्छुक *
बाळासाहेब इंदुरे
व्हा.चेअरमन जय महाराष्ट्र पतसंस्था
जय महाराष्ट्र ना. सह. पतसंस्था मर्या.करमाळा, सर्व संचालक व कर्मचारी वृंद



करमाळा शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी व किराणा व्यापारी असो; चे खजिनदार

मा.श्री.

# रितेशशेठ कटारिया

आपणांस दि.१० सप्टेंबर रोजी असलेल्या..

## वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा...



**शुभेच्छुक**

सुनील लुणिया
सुधीर कटारिया
विकास कटारिया
राजेंद्र कटारिया
दिपक कटारिया
राजेश कटारिया
ॲड.सुमित कटारिया

संतोष कटारिया
संकेत कटारिया
अभिजीत कटारिया
जितेंद्र कटारिया
नैनिष कटारिया
सचिन संचेती
निरज गुगळे

रमेश आगरवाल
अमोल मुनोत
मनोज कोठारी
मुकेश गरीया
पिंटू गुगळे
भैय्या गुगळे
अजिंक्य गुगळे

आनंद गुगळे
निलेश बोरा
पंकज सोळंकी
दिनेश मुथ्था
अमोल हिरण
केतन संचेती
बाळासाहेब बोरा

**करमाळा., जि.सोलापूर**

# आदिनाथ कारखान्याचे माजी चेअरमन डॉ.प्रदीपकुमार जाधव-पाटील यांचे निधन



करमाळा(सं.प्र.) : तालुक्यातील प्रसिध्द डॉक्टर व आदिनाथ कारखान्याचे माजी अध्यक्ष डॉ.प्रदीपकुमार जाधव-पाटील यांचे ३ सप्टेंबरला निधन झाले आहे. डॉ.जाधव-पाटील यांनी वैद्यकिय क्षेत्रात ग्रामीण भागात जावून सेवा दिली आहे. करमाळा तालुक्यातील तसेच बाहेरील तालुक्यातील रूग्ण त्यांच्याकडे उपचारासाठी येत असत. सर्पदंशावर उपचार करणारे डॉक्टर म्हणून त्यांची ओळख होती. त्यांचे वडील कै.बुवासाहेब जाधव-पाटील हे म.गांधी विद्यालयाचे शिक्षक होते. डॉ.पाटील यांच्या मागे आई, पत्नी, भाऊ संतोष जाधव-पाटील (माजी चेअरमन, आदिनाथ), मुलगा डॉ.रोहन जाधव-पाटील व उपसरपंच अभिजीत जाधव-पाटील, पुतण्या अजिंक्य जाधव-पाटील, सून डॉ.शिवानी जाधव-पाटील असा परिवार आहे.

## कामगार पाहिजेत

करमाळा शहरातील ताडपत्री व हार्डवेअर दुकानात काम करण्यासाठी गरजू व होतकरू कामगार पाहिजेत (योग्य पगार दिला जाईल)

● हेल्पर - २ ● मार्केटींग - १

संपर्क : मो८४२१२१६४६२

## दि करमाळा अर्बन को.ऑप.बँक लि; करमाळा

मेनरोड, करमाळा. ४१३२०३ जि.सोलापूर (महाराष्ट्र)

### ७९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

दि करमाळा अर्बन को.ऑप बँक लि; करमाळा या बँकेची सन २०२३-२०२४ करीता घ्यावयाची ७९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि.२१ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी ठिक ४.०० वाजता** बँकेच्या श्री गिरधरदासजी देवी सभागृहात खालील विषयांचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे.

**● सभेपुढील विषय ●**

१) दि.३०/९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२३-२०२४ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) सन २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व दोष दुरूस्ती अहवालास मान्यता देणे.
४) सन २०२३-२०२४ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे तसेच २०२४-२०२५ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
५) सन २०२४-२०२५ सालाकरीता प्रशासक यांनी नियुक्त केलेल्या अंतर्गत लेखापरिक्षकास मान्यता देणे.
६) सन २०२४-२०२५ करीता मा.रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेच्या अधीन राहून वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणेबाबत.
७) बँकेच्या एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत थकीत कर्जदारांच्या सन २०२३-२०२४ या वर्षात व्याजास दिलेल्या सुटीस मान्यता देणे.
८) बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकणाऱ्या सभासदांची रजा क्षमांकित करणेबाबत विचार करणे.
९) मा.प्रशासक यांचे मान्यतेने येणारे आयते वेळेचे विषय घेणे.

ठिकाण : करमाळा — मा.प्रशासक यांचे आदेशानूसार

दिनांक : २८/८/२०२४ — **श्री.प्रकाश रामचंद्र क्षीरसागर** (प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी)

**● सूचना ●**

१. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती त्याच दिवशी त्या ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्धा तासानंतर घेतली जाईल. त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.

२. बँकेचा सन २०२३-२०२४ सालाचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द केलेला आहे, कृपया याची नोंद घ्यावी.

३. सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्याच्या दृष्टीने ज्या सभासदांना वरील विषयावर काही प्रश्न विचारायचे असतील व काही सूचना करावयाचे असतील त्या सूचना, प्रश्न लेखी स्वरूपात दि.१८/९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत आणून द्यावीत म्हणजे सदरची माहिती ठेवणे सोयीचे होईल. त्यानंतर आलेल्या सूचनांचा व प्रश्नांचा सभेत विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी..!

## ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



**सहवास जरी सुटला स्मृती सुगंध देत राहील।**
**आयुष्याच्या प्रत्येक वळणावर आबा आठवण तुमची राहील॥**

श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे
माजी चेअरमन व आमच्या मंडळाचे संस्थापक/मार्गदर्शक

## कै.डॉ.प्रदीकुमार जाधव-पाटील


यांचे नुकतेच निधन झाले. त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आमची कमलाभवानी चरणी प्रार्थना व त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

**शोकाकुल**

**जय महाराष्ट्र मित्र मंडळ, करमाळा.**
**जय महाराष्ट्र ना.सह.पतसंस्था मर्या; करमाळा**

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!

## चिवटे उपहारगृह



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर | पुरी भाजी | पावभाजी | पाणीपुरी | पेढा, बर्फी | फरसान |
| उडीदवडा सांबर | मिसळ पाव | तवापुलाव | स्पे.भेळ | लाडू, जामून | शेव |
| उत्तप्पा | पोहे/उपमा | सॅंडविच | रगडा पॅटिस | मैसुरपाक | स्पे.चिवडा |
| डोसा | दहीवडा/शिरा | फिंगर चिप्स | राज कचोरी | काजू कतली | पापडी |

**डेअरी:** दही, दुध, खवा, पनीर, बासुंदी, लस्सी

साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.

**एकवेळ अवश्य भेट द्या..!**

**राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६**

**कोल्ड्रींक:** कोल्डकॉफी, ज्युस, मिल्कशेक, आईस्क्रीम


आमचे मार्गदर्शक
10 सप्टेंबर
करमाळा शहरातील प्रतिष्ठीत व्यापारी
मा.श्री.रितेशशेठ कटारिया
आपणांस वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
● डॉ.अनिल व्होटकर ● चंद्रशेखर शिलवंत सर
● कलिम काझी ● विनोद देवी ● महेश सुर्यपुजारी
● अनिल बदे ● मिलींद फंड ● संजय दिवाण
● संभाजी किर्दाक ● प्राचार्य नागेश माने ● सुदेश भंडारे
● लक्ष्मीकांत देवी ● गणेश वळेकर

# विद्यार्थ्यांचा आयडॉल - रईस सय्यद

महाविद्यालयीन विद्यार्थी म्हटलं .. गोंधळ, धांगडधिंगा, व्हलेंटाईन डे, वाढदिवसाचा गोंधळ, सोशल मिडीयावर फालतू पोस्ट पाहणारे अशाप्रकारे चित्र दिसते. पण यापेक्षाही एखादा विद्यार्थी आपल्या वडिलांच्या कष्टाच्या कामात सहभागी होवून यशस्वी कला आत्मसात करतो आणि वयाच्या विशीतच दरमहा हजारो रूपये कमवतो.. असे दुर्मिळ चित्र असते. याच प्रकारात करमाळा शहरातील हिरडे प्लॉट मध्ये राहत असलेल्या रईस सय्यदचा समावेश होतो.



आपण नेहमी म्हणतो.. 'पाण्यातील माशाला पोहायला शिकावे लागत नाही. खरंतर ही एक काल्पनीक म्हण असलीतरी त्याची प्रचिती करमाळा शहरातील फॅब्रीकेशन व्यवसायातील राजू जवळेकर यांचे चिरंजीव रईसच्या कृतीतून स्पष्ट झाली आहे. त्याच्या या कृतीतूनच तो महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा आयडॉल ठरला आहे.

राजु जवळेकर उर्फ गुलाब बबन सय्यद हे मुळचे जवळा, ता.जामखेड येथील असून ते सन २००० साली करमाळा येथे व्यवसायाच्या निमित्ताने आले. त्यांनी पोथरनाक्याला फॅब्रीकेशनचा व्यवसाय सुरू केला. कामातील सचोटी आणि सुबकत्ता यामुळे त्यांचा व्यवसाय चांगला सुरू झाला. त्यांना त्याच्या पत्नी अफसाना यांची साथ मिळाली. त्यांना तीन मुले आहेत. मोठा मुलगा अमन हा केमिकल इंजिनियर असून पुणे येथे जॉब करतो. तर मधला मुलगा आयान याने हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स केला असून, तो विमाननगर, पुणे येथील फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये कार्यरत आहे. तर सर्वात छोटा रईस हा वडिलांच्या सोबत आहे.

रईसचे प्राथमिक शिक्षण करमाळा येथील नगरपालिका शाळा नं.१ मध्ये झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण १२ वी पर्यंत महात्मा गांधी विद्यालयात झाले. दहावीला त्याला ८० टक्के तर बारावीला ७५ टक्के (विज्ञान शाखा) गुण मिळाले. त्यानंतर त्याने बीसीएसला प्रवेश घेण्याचे ठरविले आणि जाणिवपूर्वक बहिस्थ विद्यार्थी म्हणून आष्टी येथील भगवान महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे. यावर्षी बीसीएसच्या तिसऱ्या वर्षाला आहे. तो दहावीला असताना लॉकडाऊन पडले. त्या कालावधीत त्याने आपल्या वडिलांच्या सोबत वडिल नको म्हणत असतानाही काम करण्यास सुरूवात केली. वडिलांचे काम पाहून तो फॅब्रीकेशनचे सर्व काम शिकला आहे. त्यामध्ये ग्रील, दरवाजे, शेती अवजारे, स्टील रेलींग, वाहनाची स्टील बॉडी इ. कामे करत आहे. विशेष म्हणजे तो स्वत: कामे घेऊन वेळप्रसंगी रात्रपाळीचे काम करून ग्राहकाला वेळेत वस्तू देऊन कमीटमेंट पूर्ण करत आहे. त्याच्या हातामध्ये सुबकत्ता असल्याने ग्राहकांचा ओढा ए.सी.ॲग्रो एजन्सी या त्यांच्या दुकानाकडे आहे.

# आदिनाथ सभासद व कामगार एकजुटी

ऊस क्षेत्राच्या मध्यभागी असलेला आदिनाथ कारखाना आज शेवटची घटका मोजत आहे. रोजगार निर्माण करण्याऐवजी आदिनाथवर अवलंबून असणाऱ्या कामगार व शेतकरी यांच्या जीवाशी हे सरकार खेळत आहे. मा. आमदार करमाळा यांचा कमलाभवानी कारखाना व ना.तानाजी सावंत यांचा विहाळ कारखाना हे दोन्ही कारखाने स्वत:चे मालकीचे. या दोन्ही आमदारांचे कारखाने तालुक्यात असल्याने करमाळा तालुक्यातील शेतकरी यांच्या मालकीचा आदिनाथ आहे. आदिनाथ बंद असल्याने आदिनाथ सभासदांचा ऊस नेण्यासाठी आमचे काम कर नाहीतर ऊस घेतला जाणार ही भुमिका..! आदिनाथ बंद आहे याबाबत ना.सावंत व आ.शिंदे काय भुमिका घेवू शकले नाही. कारण आदिनाथ बंद असल्यास ऊस उत्पादकाची पिळवणूक करून स्वत:ची राजकीय पोळी भाजविण्याचे काम करत आहेत. आदिनाथ सभासदांचा ऊस कवडीमोल किंमतीत गाळप करून नेहमी स्वत:च्या राजकारणासाठी पिळवणूक करायची. आदिनाथ कारखान्यावर प्रशासक नेमून आपापसात स्वत:ची राजकीय पोळी भाजून घ्यावयाची आहे. पण आदिनाथ सभासद व कामगार यांनी आपल्याला ओळखून सोडले आहे.

माझ्या ऊस उत्पादक सभासदांचा कारखाना असावा म्हणून माजी आमदार स्व.रावसाहेब पाटील, स्व.गोविंदबापू पाटील, स्व.गिरधरदास देवी यांनी स्वत:चे निस्वार्थीपणे आयुष्य वेचले. या महान नेत्यांनी आदिनाथ उभा केला आणि कर्जमुक्तही केला होता. काही स्वार्थी राजकारण्यांनी आदिनाथची सर्व संपत्ती स्वत:च्या स्वार्थासाठी वापरून आदिनाथ सभासद व कामगार यांच्या संसाराची होळी केली. पण आता सभासद व कामगार जागा झाला असून २०२४ मध्ये आदिनाथवरील प्रशासक उठवून आदिनाथ कारखाना चालू नाही झाल्यास सरकारचा एकही आमदार मंत्री तालुक्यात फिरू द्यावयाचा नाही; अशी सभासद व कामगार एकजुटीने ठरवणार आहेत..! **..रमेश रोकडे (मा.अध्यक्ष - कामगार संघटना)**

**विकणे आहे**

मेनरोडवरील बाजारपेठेतील ५६० स्क्वे.फुट (१६ X ३५)
दोन मजली बांधकाम असलेली जागा
योग्य किमंतीत विकणे आहे.

संपर्क
मो.९७६६२९१५५२




ज्यांनी पुणे शहरात स्वत: दोन लाखाचे
वर वृक्षारोपण केले, असे आमचे भाचे
वृक्ष प्राधिकरण समिती पुणे शहराचे सभासद
व पुणे पर्यावरण आघाडी भाजपा अध्यक्ष
मा.श्री.संदीपजी काळे
यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !
श्री.संदीपजी काळे
अध्यक्ष-पुणे पर्यावरण आघाडी भाजपा
नम्रता राजेंद्र रणसिंग
(७/९/२०२४ वाढदिवस)
सानिका काळे
(१५/९/२०२४ वाढदिवस)
▪ नम्रता राजेंद्र रणसिंग
▪ सानिका काळे
▪ विवेक एकाड
या सर्वांना वाढदिवसाच्या लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा !
विवेक एकाड
(६/९/२०२४ वाढदिवस)
शुभेच्छुक
श्री.राजेंद्र रणसिंग
व रणसिंग परिवार, आप्तेष्ट सगरेसोयरे


शिवसेना
शहरप्रमुख
नूतन उपशहरप्रमुख
शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे
करमाळा शहर उपप्रमुख पदी
श्री.लक्ष्मण भगवानराव
यादव(पेंटर)
यांची निवड झाल्याबद्दल
हार्दिक अभिनंदन !
श्री.जितेंद्र महादेव सुरवसे
(मा.ता.उपप्रमुख, शिवसेना)
सागर परदेशी
संभाजीनगर, कुंभारवाडा शिवसेना
शाखाप्रमुख
शुभेच्छुक
किल्लावेस शिवसेना शाखा


महाराष्ट्र राज्य नगरपालिका व महानगरपालिका शिक्षक
संघाच्या वतीने सन २०२३-२४ करीता देण्यात येणारा
'आदर्श सक्षम महिला' पुरस्कार
न.पा.मुलांची शाळा क्र.१ च्या मुख्याध्यापिका
सौ.सुनंदा सुरेश जाधव (माने)
यांना मिळाल्याबद्दल..
हार्दिक अभिनंदन
शुभेच्छुक
● श्री.शिवाजी भगवान काटूळे ● सौ.गंगा शिवाजी काटूळे
● डॉ.सौ.तृप्ती अजित भोरे ● चि.राधेशाम शिवाजी काटूळे
● चि.कौस्तुभ शिवाजी काटूळे व समस्त काटूळे परिवार
शेलगाव(क), ता.करमाळा., जि.सोलापूर.


करमाळा शहरातील
किराणा मालाचे प्रतिष्ठीत
व्यापारी व आमचे जिवलग मित्र
मा.रितेशशेठ
कटारिया
आपणांस वाढदिवसाच्या
लाख.. लाख..
हार्दिक शुभेच्छा
10
सप्टेंबर
शुभेच्छुक
महावीर साडी सेंटर
गुजरगल्ली, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : नैनिष कटारिया)

# शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी त्वरीत निधी उपलब्ध करून देऊ : आ.शिंदे



करमाळा(सं.प्र.) : धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान व शहरातील विविध संघटनेचे व्यापारी यांनी केलेल्या मागणीनुसार करमाळा शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी त्वरीत निधी उपलब्ध करून देऊ; असे आश्वासन आमदार संजयमामा शिंदे दिले.

करमाळा शहरात चोरी तसेच छेडछेडीचे प्रमाण वाढत आहे. चोरी झाल्यास त्याचा तपास त्वरीत लागण्यासाठी धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान व शहरातील विविध संघटनेचे व्यापारी यांनी एकत्र येऊन सुरक्षितेच्या दृष्टीने करमाळा शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत निधी उपलब्ध करून द्यावा.. अशा मागणीचे निवेदन आमदार संजयमामा शिंदे यांना दिले. त्यावेळी आमदार शिंदे यांनी निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. यावेळी धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान व मनसेचे तालुका अध्यक्ष संजयबापू घोलप, विमा प्रतिनिधी चेतन किंगर, सोलापूर जिल्हा सराफ व सुवर्णकार असोसिएशनचे राधेशाम देवी, भैय्या राठोड, किराणा व्यापारी असो; चे रितेश कटारिया, करमाळा तालुका केमिस्ट अॅन्ड ड्रगीस्ट असो; चे रविंद्र बरीदे, कापड व्यापारी असो; चे पप्पूशेठ सिंधी, केशव प्रतिष्ठान व भाजपाचे शहराध्यक्ष जगदीश आगरवाल, लोकमान्य टिळक तरूण मंडळ फंडगल्लीचे अतुल फंड, स्नेहल कटारिया, डॉक्टर असो; चे डॉ.सुहास कुलकर्णी, रहेनुमा चॅरिटेबल सोशल वेल्फेअरचे आझाद शेख, वंचित बहुजन आघाडीचे यशपाल कांबळे, छत्रपती शिवाजी महाराज तरूण मंडळाचे संजय सावंत, श्री गिरधरदास देवी प्रतिष्ठानचे कन्हैयालाल देवी, करमाळा तालुका लॅब असो; चे नेर्लेकर, ज्येष्ठ नागरीक संघटनेचे दत्तात्रय चोपडे गुरूजी यांचेसह लक्ष्मीकांत ठोंबरे, भावना गांधी, राजेश कटारिया, नागेश गुरव, विनय ननवरे, प्रविण जाधव, डॉ.अविनाश घोलप, दिपक थोरबोले, जोतीराम लावंड, यश दोशी,अशोक गोफणे, योगेश काळे, यश जाधव, संजय भालेराव, राजाभाऊ बागल, सूरज शेख, शहाजी ठोसर, नरेंद्र ठाकूर, विश्वनाथ घोलप, नानासाहेब मोरे, अशपाक जमादार, अजिंक्य पाटील, फुरकान काझी, नागेश दुधाट, आकाश कवडे, अमर करंडे, स्वप्नील कवडे, सचिन कणसे, सोनु झाडबुके, संतोष घोलप, वैभव गायकवाड आदी उपस्थित होते.

> आमदार संजयमामा शिंदे यांनी जर सीसीटीव्हीच्या माध्यमातून जनतेची सुरक्षेची काळजी घेतली व निधी दिला तर निश्चितच करमाळ्यातील जनता त्यांच्या राजकीय सुरक्षेची काळजी घेईल.
>
> ...संजयबापू घोलप
>
> (अध्यक्ष-धर्मवीर संभाजीराजे प्रतिष्ठान/ता.अध्यक्ष, मनसे)

# गजानन सोशल अॅन्ड स्पोर्ट क्लब गणेशोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी मेजर अमोल कांबळे




करमाळा(सं.प्र.) : गजानन सोशल अॅन्ड स्पोर्ट क्लब गणेशोत्सव समितीच्या अध्यक्ष पदी मेजर अमोल कांबळे यांची तर उपाध्यक्ष पदी परमसिंग मल्होत्रा व बाशिदभाई शिकलकर व खजिनदार पदी तीर्थराज भांडवलकर, सचिव पदी ओम लोकरे, मिरवणूक प्रमुख पदी अमित बुद्रूक व कार्याध्यक्ष पदी साई पलंगे यांची निवड करण्यात आली आहे. गजानन सोशल अॅन्ड स्पोर्ट क्लब मंडळाचे हे रौप्यमहोत्सवी आहे. मंडळाची स्थापना १४ जानेवारी २००० ला झाली असून तेव्हापासून गणेश उत्सव तसेच मागील काही वर्षापासून गणेश जयंती कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हिंदू-मुस्लिम बांधव गुण्यागोविंदाने या मंडळात काम करत असून सर्वधर्म समभावाचे प्रतिक असल्याचे संस्थापक प्रशांत ढाळे यांनी सांगितले.

साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलिंग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.

प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

# रामकृष्ण माने यांच्या सामाजिक कार्याला नेहमीच सहकार्य करू : आ.संजयमामा शिंदे



करमाळा(सं.प्र.) : समाजातील वंचित घटकासाठी सामाजिक कार्यकर्ते रामकृष्ण माने यांनी उभारलेले कार्य आदर्शवत आहे. समाजात अजूनही अनेक घटक हे विकासाच्या प्रवाहात आलेले नाहीत. विकासापासून दूर असलेल्या घटकांना न्याय देण्यासाठी माने हे कार्य करत असताना त्यांच्या सामाजिक कार्याला आवश्यक ते सहकार्य व मदत नेहमीच करत राहणार आहे; असे प्रतिपादन आमदार संजयमामा शिंदे यांनी केले.

भटके विमुक्त जाती संघटनेचे राज्य उपाध्यक्ष, एकलव्य आश्रमशाळेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण माने यांच्या वाढदिवसानिमित्त आश्रमशाळेत सत्कार समारंभ, रक्तदान शिबीर व विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी आमदार शिंदे बोलत होते. यावेळी पद्मश्री, उपराकार लक्ष्मण माने., ज्येष्ठ पत्रकार विवेक येवले, अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे तालुका अध्यक्ष संतोष कुलकर्णी, नाभिक समाज संघटनेचे तालुका अध्यक्ष नारायण पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य उध्दव माळी, गयाबाई बहुउद्देशीय समाजसेवी संस्थेचे अध्यक्ष किसन कांबळे, महेश वैद्य, धनंजय शिंदे, प्रकाश माने, अंकुश जाधव, डॉ.गणेश राऊत, पत्रकार सिध्दार्थ वाघमारे आदी उपस्थित होते. यावेळी उपस्थितांचे वतीने आमदार शिंदे यांचे हस्ते रामकृष्ण माने यांचा वाढदिवसानिमित्त सन्मान करण्यात आला. यावेळी उपराकार लक्ष्मण माने यांनी रामकृष्ण माने यांनी उभारलेली शैक्षणिक चळवळ ही महत्वाची आहे. त्यांच्या प्रयत्नाने कित्येक मुले शिक्षणाच्या वाटेवर आल्यामुळे त्यांची प्रगती होत राहिली. पारधी समाज गुन्हेगारीपासून दूर होवून स्थिर आयुष्य जगण्याचा प्रयत्न करू लागला आहे; असे सांगितले विवेक येवले यांनी माने यांचा जीवनप्रवास संघर्षमय असून त्यांनी संघर्षावर मात करून सामाजिक क्षेत्रात कार्य उभारले; असे स्पष्ट केले.

सत्काराला उत्तर देताना रामकृष्ण माने म्हणाले, की सन १९९४-९५ पासून सामाजिक कार्य सुरू केले. बिनचेहऱ्याच्या माणसांना चेहरा देण्याचा प्रयत्न केला. अजुनही भटक्या समाजातील नागरीकांना स्थैर्यत्व येणारी उत्पन्न देणारी साधने नाहीत. उदरनिर्वाहाच्या अडचणी आहेत. त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करत आहे. हे कार्य असेच कायम राहील. समाजकामातून समाधान मिळत आहे.

यावेळी रक्तदान शिबीराचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते प्रमोद झिंजाडे यांचे हस्ते झाले. याप्रसंगी बाजार समितीचे माजी उपसभापती चिंतामणी जगताप, विनय ननवरे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामचंद्र बोधे, ग्रामसुधार समितीचे अध्यक्ष अॅड.डॉ.बाबूराव हिरडे, माजी सरपंच संतोष वारे, उद्योजक बालाजी चांदगुडे, डॉ.रोहन पाटील आदींनी शुभेच्छा व्यक्त केल्या. या शिबीरात मल्लिकार्जुन ब्लड सेंटरच्या वतीने रक्त संकलन करण्यात आले. याप्रसंगी आश्रमशाळेत आयोजित विविध गुणदर्शन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. उपस्थितांचे स्वागत युवा एकलव्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष अॅड.संग्रामदादा माने यांनी केले. प्रास्ताविक विठ्ठल जाधव, सुत्रसंचालन किशोरकुमार शिंदे यांनी केले. आभार अशोक सांगळे यांनी मानले.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !


पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

आनंदऋषि नेत्रालय व्हिजन सेंटर

रेबन गॉगल, फास्ट्रॅक, लाईफस्टाईल गॉगलचे स्टॉकिस्ट डिलर अनेक व्हारायटीसह सर्व चष्मे मिळतील.
• सर्व प्रकारचे कॉन्टॅक्ट लेंस, चष्मे, गॉगल्स विक्री व दुरूस्तीचे ठिकाण
कॉम्प्युटरव्दारे मोफत नेत्रतपासणी करून मिळेल.
मोतीबिंदू बिनटाक्याची शस्त्रक्रिया : २२०० रू. (औषध व लेन्स खर्चासह)
दर महिन्याचा तिसरा रविवारी शिबीर वेळ : सकाळी १० ते २ पर्यंत
Ray-Ban गॉगल्स चे अधिकृत विक्रेते
श्री कमलादेवी ऑप्टीकल्स नगरपालिका शॉपींग सेंटर, दत्तपेठ, करमाळा.
प्रोप्रा : चाळक किसरेकर मो.९४२३५३५४४२


किराणा व्यापारी असोसिएशनचे खजिनदार
मा.श्री.रितेशशेठ कटारिया
आपणांस दि.१० सप्टेंबर रोजी
असलेल्या वाढदिवसास
हार्दिक शुभेच्छा...
शुभेच्छुक
किराणा व्यापारी असोसिएशन, करमाळा
अमोद संचेती(मा.नगराध्यक्ष), सोमनाथ चिवटे (अध्यक्ष/मा.उपनगराध्यक्ष)
राजूशेठ शियाळ, पिंटूशेठ गुगळे, संदेश दोशी, सुनिल कटारिया
सम्राट गांधी, प्रितम शियाळ, संदीप व्होरा, बाहुबली दोशी, विजय
गुगळे, केतन संचेती, जयंती संचेती, सचिन संचेती, रमेश आगरवाल
मनोज कोठारी, दिपक कोठारी, प्रितम दोशी, स्वप्नील दोशी
प्रविण देवी, गोलू सिंधी, शिवराज चिवटे, संकेत कटारिया

## ॥ भावपूर्ण श्रध्दांजली ॥



श्री आदिनाथ सहकारी साखर कारखान्याचे
माजी चेअरमन व आमच्या मंडळाचे मार्गदर्शक

### कै.डॉ.प्रदीपकुमार जाधव-पाटील

यांचे नुकतेच निधन झाले. त्याच्या कुटूंबियाच्या दु:खात आम्ही सहभागी असून, त्यांचे आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आमची कमलाभवानी चरणी प्रार्थना व त्यांच्या स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !


शोकाकुल

**श्री गणेश व्यापारी तरूण मंडळ**
**मेनरोड, करमाळा.**


## हॉटेल भाड्याने देणे आहे

करमाळा-कर्जत रोडवरील **'हॉटेल स्पॉटलाईट'** संपूर्ण सेटअप सहीत भाडेतत्वावर देणे आहे.

- संपूर्ण किचन सेटअप • गार्डन आणि ८ टेंट
- मोठा हॉल आणि १४ टेबल
- संपूर्ण हॉल मध्ये समुद्री रेती • प्रशस्त पार्किंग



**संपर्क : सागर नवले (मो.8600890099)**


## गुरू गणेश दिव्यरत्न गोपालन संस्थेत बैलपोळ सण उत्साहात साजरा





करमाळा(सं.प्र.) : गुरू गणेश दिव्यरत्न गोपालन संस्थेत बैलपोळ सण उत्साहात साजरा करण्यात आला. गोपालन संस्थेत सध्या ९० गोमातेची सेवा केली जाते. या सर्व गोमातेची पुजा गो-सेवा समितीचे सदस्य तसेच प्रमुख अतिथी यांच्या उपस्थित करण्यात आली. त्यानंतर पोळयांच्या स्नेहभोजनाचा आस्वाद सर्व उपस्थितांनी घेतला.गोपालन संस्थेचे अध्यक्ष श्रेणिक खाटेर यांनी गोमातेचे महत्व सांगून गाईची पुजा करण्यात आली. यावेळी माजी उपनगराध्यक्ष ॲड.कमलाकर वीर यांनी श्रेणिक खाटेर व गो सेवा समितीचे सर्व सदस्य यांच्या कार्याचे कौतूक करून भावी सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी जैन संघाचे अध्यक्ष रमेश कटारिया, पिंटूशेठ गुगळे, बाळासाहेब वांगडे, प्रकाश मुनोत, नलवडे साहेब, अमृत कटारिया, नितीन दोशी, प्रितम दोशी, वैभव दोशी, विनोद पडवळे, आदेश ललवाणी, सतीश बलदोटा, केतन संचेती, गणेश बोरा, अक्षय मंडलेचा, दिनेश मुथा, जीवन संचेती, अभय शिंगवी, संकेत खाटेर,वर्धमान खाटेर, संगीता खाटेर, मोक्षा खाटेर, पोपटराव काळदाते, चंद्रकांत काळदाते, अमोल महाराज काळदाते, विजय बरीदे, गिरीश शहा आदीजण उपस्थित होते. आभार वर्धमान खाटेर यांनी मानले.


पुणे येथील सुप्रसिध्द पोटविकार तज्ञ

## डॉ.अभिजीत लक्ष्मण नीळ

(M.S.FMAS) (Endoscopist - Laproscopist)

**प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या रविवारी**

**करमाळ्यात उपलब्ध !**

15 / 09 / 2024

नांवनोंदणी आवश्यक

पोटविकाराच्या रूग्णांना उपचारासाठी
आता परजिल्ह्यात जायची गरज नाही..,
आता पोटविकार तज्ञ करमाळ्यातच उपलब्ध !

**पोटविकारांच्या सर्व समस्यांवर निदान व अल्पदरात उपचार**




उपलब्ध सुविधा...

- अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे निदान व शस्त्रक्रिया (General surgery) लॅप्रोस्कोपी व एन्डोस्कोपी
- कर्करोग (कॅन्सर) उपचार व शस्त्रक्रिया (Onco surgery)
- मूत्रविकार उपचार (Uro surgery)
- अपघात विभाग, सांधेबदल शस्त्रक्रिया (Ortho pedic surgery)
- मेंदू/मणका विकार उपचार शस्त्रक्रिया (Nuro surgery)
- स्त्रीरोग व प्रसुतितज्ञ विभाग (Gynaec surgery)
- मुळव्याध/भगंदर-फिशियर उपचार व शस्त्रक्रिया (Piles surgery)

### एन्डोस्कोपी

माफक दरात उपलब्ध
(एन्डोस्कोपीसाठी उपाशीपोटी यावे)



पत्ता

**शिवश्री क्लिनिक**
सचिन मेडिकल समोर, B.M. कॉम्प्लेक्स, दत्तपेठ, करमाळा.(9860982072)

संपर्क...
मो.8291174004
मो.9860982072
मो.9096613132

- स्पर्श हॉस्पिटल रहाटणी, पुणे.
- स्पर्श हॉस्पिटल काळेवाडी, पुणे
- अमृते/स्पर्श हॉस्पिटल चिंचवड(पुणे)